**International Journal of Advance and Applied Research (IJAAR)**
**Peer Reviewed Bi-Monthly**
**ISSN – 2347-7075**
**Impact Factor – 7.328**
**Vol.8 No.6 July – Aug 2021**

# सिंचन प्रकल्प, विस्थापन आणि शेतकऱ्यांचे सिमान्तीकरण

**अंकुश एम. गोंडगे**
सहाय्यक प्राध्यापक,
समाजशात्र विभाग,
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

**प्रस्तवाना:**

शेती, उद्योग यांच्या विकासासाठी आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा व्हावी यासाठी मोठी धरणे बांधण्याचे काम स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आले या प्रकल्पांमुळे शेतीला काही प्रमाणात सिंचनाच्या सुविधा निर्माण झाल्या. उद्योगांचा विकास देखील झाला. शहरांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा झाला. शहरांचा विकास झाला. परंतु या प्रकाल्पनिर्मितीमुळे अनेक लोकांना विस्थापित व्हावे लागले.

सिमान्तीकरण ही एक प्रक्रिया आहे. एखादा समूह किंवा समुदाय जेव्हाआपल्या मूळ प्रवाहापासून दूर होतो, अपवार्जीत होतो तेव्हा या प्रक्रियेला सिमान्तीकरण म्हटले जाते. सिमान्तिक समूह ही संकल्पना मुख्य प्रवाहापासून दूर राहणाऱ्या लोकांसाठी वापरली जाते.यामध्ये प्रामुख्याने अनुसूचित जाती-जमाती, इतर मागास प्रवर्ग, महिला, शेतमजूर, शारीरिक दृष्ट्या विकलांग यासारख्या सामाजिक व आर्थिक दृष्ट्या वंचित समूहांचा समावेश होतो. अनुसूचित जाती-जमाती, इतर मागास प्रवर्ग व महिला यांचा सिमान्तिक समूहांच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात अभ्यासकेला जातो परंतु त्यातुलनेत सिंचनप्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या शेतकऱ्यांच्या स्थितीत बदल होऊन त्यांचे त्यांचे सिमान्तीकरण होते अशा शेतकऱ्यांच्या सिमान्तीकरणाचा फारसा अभ्यास होत नाही. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधात सिंचनप्रकल्पांमुळे विस्थापित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या सिमान्तीकरणाचा आढावा घेण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनात माहितीच्या स्रोतांसाठी संदर्भग्रंथ मासिके, विविध अहवाल, वृत्तपत्र, इंटरनेट यासारख्या दुय्यम साधनाचा आधार घेण्यात आला आहे.

**विस्थापनाचा अर्थ:**

विस्थापन ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये व्यक्ती किंवा समूह ज्या निवासस्थानांवर राहत होते ती निवासस्थाने व ज्या नैसर्गिक संसाधनांवर उपजीविका भागवत होते ती नैसर्गिक संसाधने नैसर्गिक कारणांमुळे किंवा मानवनिर्मित कारणांमुळे नष्ट झाल्यामुळे त्यांना ती सोडावी लागतात व निवासासाठी आणि उपजीविका भागवण्यासाठी इतरत्र जावे लागते.

विस्थापन ही एक अशी प्रक्रिया आहे जी व्यक्तीला आपले मूळ निवासस्थान आणि आपल्या सामाजिक - सांस्कृतिक जीवनापासून वेगळ करते विस्थापनाचा मानवी जीवन आणि त्याच्या सामाजिक संबंधांवर प्रतिकूल परिणाम होतो सामान्यतः विस्थापन हे सक्तीचे असते. विस्थापनामागे दबावाचे तत्व समाविष्ट असते. विस्थापानामुळे जेव्हा एक व्यक्ती, कुटुंब किंवा समूह आपल्या मूळ निवासस्थान, पूर्वजांची घरे, जमीन सोडून जाते तेव्हा त्यांना त्यापासून दूर जाणे कष्टदायक असते. जो मोबदला दिला जातो तो अपुरा असतो. व्यक्ती त्याचा विनियोग तत्कालीन गरजा भागवण्यासाठी करतात आणि त्यानंतर त्यांचे जीवन दयनीय आणि कष्टदायक होत जाते (सिंह, २०१६:३१).

जोस मरीकन आणि जॉर्ज यांच्या मते, 'विस्थापन अशी संकल्पना आहे की, विकासाच्या प्रकल्पाकरिता लोकांना त्यांच्या मुळच्या स्थानावरून उठविले जाते (Marickan & George, 2003:26).

पॉब्लो बोस यांच्या मते, विकास प्रवृत्त विस्थापन म्हणजे आर्थिक विकासाच्या हेतूसाठी समुदाय आणि व्यक्तींना त्यांच्या घर आणि जमिनीवरून सक्तीने बाहेर हाकलणे. (Pablo Bose, 2014).

थोडक्यात, मूळ निवासस्थाने व उपजीविकेची साधने नष्ट झाल्यामुळे व्यक्ती किंवा एखादा समूह एका ठिकाणावरून दुसर्या ठिकाणी निवास व उपजीविकेसाठी जातो त्याला विस्थापन असे म्हणतात. विस्थापन व स्थलांतर या वेगवेगळ्या प्रक्रिया आहेत. स्थलांतर हे ऐच्छिक असते तर विस्थापन हे सक्तीचे असते. म्हणून विस्थापनाला सक्तीचे स्थलांतर असेही म्हणतात

**सिंचन प्रकल्पांमुळे होणारेशेतकऱ्यांचे विस्थापन व सिमान्तीकरण**

विकास प्रकल्प हे विस्थापनाचे प्रमुख कारण आहे. त्यातही इतर विकास प्रकल्पांच्या तुलनेत धरणांमुळे विस्थापित होणारांचे प्रमाण अधिक आहे १९९३ मध्ये जागतिक बँकेच्या १६४ प्रकल्पांमुळे

एकूण १९,६३,००० लोक विस्थापित झाले. यामध्ये सर्वाधिक १३,०४,००० लोक ४६ धारण प्रकल्पांमुळे विस्थापित झाले. तर उर्वरित ६,५९,००० लोक शहरी पायाभूत सुविधा, पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्था, परिवहन, खाणकाम व इतर प्रकल्प अशा १०० प्रकल्पांमुळे विस्थापित झाले (World Bank:1996). यावरून असे स्पष्ट होते की, इतर प्रकल्पांपेक्षा धरणांमुळे जास्त प्रमाणात लोक विस्थापित होतात. तसेच धरणासाठी जी जमीन ताब्यात घेतली जाते ती नदीच्या खोऱ्यातील असते व याचा परिणाम तेथील शेतकऱ्यांवर होतो.

जलद आर्थिक विकास साधण्यासाठी शासनाने मोठी धरणे बांधण्यास सुरुवात केली. १९४७ ते १९७९ च्या दरम्यान जगात जी धरणे बांधली गेली त्यातील १५% धरणे भारतातील आहेत. इन्स्टीट्युट फॉर सोसिओ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट च्या बालाजी पांडेच्या मते, १९५१ ते १९८५ च्या दरम्यान देशभरात सुमारे २ कोटी १६ लाख लोक पाठबंधारे प्रकल्पांमुळे विस्थापित झाले. उद्योगांमुळे २४ लाख व खाणींमुळे २१ लाख लोक विस्थापित झाले. साधारणपणे १९८५ पर्यंत विस्तापितांची संख्या २ कोटी आहे पण १९८५ ते १९९५ व त्यानंतरच्या काळात विकासाचा वेग वाढला व त्यामुळे विस्थापितांच्या संख्येत आणखी काही कोटींची भर पडली आहे (Pandey, 1998:35).

धरणासाठी मोठ्या प्रमाणात जमीन अधिग्रहण केली जाते. शेतकऱ्यांना या जमिनीचा मोबदला शासनाकडून दिला जातो. परंतु तो अतिशय कमी असतो. मोबदला स्वरुपात मिळालेल्या पैशातून शेतकरी नवीन जमीन खरेदी करू शकत नाहीत. त्यामुळे ते भूमिहीन होतात. शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन शेती असते. एकूण ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीवरच अवलंबून असते. धरणात शेती गेल्यामुळे शेतकरी भूमिहीन बनतात किंवा अल्पभूधारक बनतात यामुळे त्यांचे सिमान्तीकरण होते. त्यांना इतर गावातील लोक सहजसाहजी सामावून घेत नाहीत. त्यांची सामाजिक, राजकीय, आणि आर्थिक स्थिती खालावते.

धरणामुळे विस्थापित झालेल्या शेतकऱ्यांचे आर्थिक, राजकीय, सामाजिक अशा सर्व अंगणी सिमान्तीकरण घडून येते. धरणात शेती गेल्यामुळे शेतकऱ्यांच्या व्यवसायावर याचा परिणाम होतो. जमिनीच्या मिळालेल्या मोबदल्यातून जमीन खरेदी करता येत नाही त्यामुळे शेतकऱ्यांना भूमिहीन व्हावे लागते. त्यांचा पारंपारिक व्यवसाय संपतो साहजिकच त्यांच्या आर्थिक स्थितीवर याचा परिणाम होतो. विस्थापनानंतर गाव विखुरले जाते. सर्वच लोक पुनर्वसित गावठाणात राहण्यासाठी येत नाहीत. त्यामुळे

पारंपारिक राजकीय भूमिका व नेतृत्व यांच्यात बदल होतो ग्रामीण समाजात व्यक्तीची प्रतिष्ठा ही त्यांच्याकडे असलेल्या शेतीवरून ठरते. परंतु धरणात शेती गेल्यामुळे विस्थापित शेतकऱ्यांची पंचक्रोशीतील प्रतिष्टा संपते किंवा खालावते मुलांचे विवाह जुळवतांना अडचणी येतात धार्मिक स्थळे, श्रद्धास्थाने पाण्याखाली जातात. पूर्वजांच्या समाधी पाण्याखाली जातात. त्यामुळे सामजिक हानी होते. यातून विस्थापितांचे सामाजिक सिमान्तीकरण घडून येते

**उपाय योजना :**

१. सिंचनात वाढ करण्यासाठी मोठ्या प्रकल्पांएवजी लघुप्रकल्प बंधारे बांधण्यावर भर द्यावा
२. नवीन प्रकल्प सुरु करण्याएवजी अपुरे प्रकल्प पूर्ण करण्यावर भ द्यावा.
३. शेतकऱ्यांना जमिनीच्या मोबदल्यात जमीन द्यावी.
४. नवीन घरे बांधून द्यावीत
५. जमीन अधिग्रहण करतांना शेतकऱ्यांची सहमती घ्यावी

**संदर्भ:**


१. Marickan, J. & George, M. (2003). Development Induced Displacement. Banglore:
२. सिंह.रावत पब्लिकेशन्स :जयपूर .एवं पुनर्वासविकास विस्थापन .(२०१६) .राजू ,
३. Pablo, B. (2014). Development Induced Displacement and Participation. Retrieved from http://www.yorku.ca/ces/EDID/EDID%20Documents/EDID%20EP%202.pdf (accessed 7 December 2014).
४. World Bank Environment Department (WBED). (1996) *Resettlement and Development: The Bankwide Review of Projects Involving Involuntary Resettlement, 1986-1993*. Environment Department Paper No. 032, Resettlement Series. Washington, D.C.: World Bank. Retrieved from http://www-wds.worldbank.org/servlet/WDSContentServer/WDSP/IB/1996/03/01/000009265_3980728143956/Rendered/PDF/multi_page.pdf .
५. Pandey, B. (1998). Depriving the Underprivileged for Development. Bhubaneswar: Institute of Socio- Economic Development.